# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.10.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणूकीसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर;
- महाविकास आघाडीकडून जागावाटपाचा तिढा सुटल्याचं जाहीर, तीनही घटक पक्ष लढवणार प्रत्येकी 85 जागा;
- संभाजी ब्रिगेड लढवणार स्वबळावर 50 जागा; मनसेकडूनही उमेदवारांची नावे जाहीर
- मतदार जागृती साठी उपाययोजना सुरू

आणि,

- नाराज उमेदवारांचा कल पक्षांतराकडे

**पुणे**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे काल उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली, यात हडपसर मतदार संघातून आमदार चेतन तुपे, मावळमधून सुनील शेळके, आणि जुन्नरमधून अतुल बेनके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनं रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूण विधानसभा मतदारसंघातून आमदार शेखर निकम यांना उमेदवारी दिली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोपरी पांचपाखाडी विधानसभा मतदार संघासाठी  उमेदवारी अर्ज 28 ऑक्टोबर रोजी भरणार आहेत. धुळे जिल्ह्यातल्या साक्री विधानसभा मतदारसंघासाठी शिवसेनेनं आमदार मंजुळा गावीत यांना उमेदवारी दिली आहे. गावीत यांनी गेल्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष लढत विजय मिळवला होता.रत्नागिरीतून उदय सामंत, राजापुरातून किरण सामंत, तर दापोलीतून योगेश कदम यांना शिवसेनेकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. रायगड जिल्ह्यात महाडचे भरत गोगावले, अलिबागचे महेंद्र दळवी आणि कर्जतचे महेंद्र थोरवे या तीनही आमदारांना शिवेसेनेनं पुन्हा उमेदवारी दिली आहे. धुळे शहरातून भाजपानं याआधी अनुप अग्रवाल, शिंदखेडा मतदारसंघातून आमदार जयकुमार रावल आणि शिरपूर मतदारसंघातून आमदार काशिराम पावरा यांना उमेदवारी जाहीर केली आहे.परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर मतदार संघात भाजपाच्या मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी अर्ज दाखल केला आहे.

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर मतदार संघात आदिवासी विकासमंत्री डॉ विजयकुमार गावित यांचे लहान बंधू शरद  गावित यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.

**महाविकास आघाडी**

महाविकास आघाडीतला जागावाटपाचा तिढा सुटला असून तिन्ही प्रमुख पक्षांना प्रत्येकी 85 जागा देण्यात आल्याची माहिती महाविकास आघाडीकडून काल पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जयंत पाटील उपस्थित होते. खासदार संजय राऊत यांनी याबद्दलची माहिती पत्रकारांना दिली. उर्वरित 18  जागा महाविकास आघाडीमधल्या इतर घटक पक्षांना देण्यासंदर्भात आज चर्चेला सुरुवात होईल, अशीही माहिती यावेळी देण्यात आली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून सोलापूर दक्षिण मतदारसंघातून अमर पाटील, बोईसरमधून विश्वास वळवी, पालघरमधून जयंत दुबळा तर मालेगाव बाह्य मतदार संघातून अद्वय हिरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या वाशिम विधानसभा मतदार संघामध्ये डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. नाशिक शहरातल्या मध्य नाशिक आणि पश्चिम विधानसभा मतदारसंघात दोन्ही जागांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. नाशिक मध्य मधून माजी आमदार वसंत गीते तर नाशिक पश्चिम मधून जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मात्र नाशिक मध्य विधानसभा मतदरसंघात काँग्रेसकडून डॉ. हेमलता पाटील यांनी निवडणूक लढवणार असल्याचं सांगितलं आहे.

**मनसे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे काल अनेक उमेदवारांच्या नावांची घोषणा झाली. कोथरूडमध्ये किशोर शिंदे, हडपसरमध्ये साईनाथ बाबर तर खडकवासल्यातून मयुरेश वांजळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक पश्चिममध्ये दिनकर पाटील, वडाळ्यात स्नेहल जाधव तर कुर्ल्यातून प्रदीप वाघमारे यांच्या नावाची घोषणा मनसेकडून करण्यात आली आहे.

**संभाजी ब्रिगेड**

राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर निवडणूक लढणार असून पन्नासपेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे आणि मुख्य प्रवक्ते डॉक्टर गंगाधर बनबरे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान 4 ते 5 जागा देण्याचं आश्वासन दिलं होतं, परंतु आश्वासनानुसार जागा दिल्या नसल्याचा आरोप आखरे यांनी केला.

**मतदान टक्केवारी**

मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मोठ्या गृहनिर्माण सोसायटयांमध्ये जनजागृती करण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात ‘माझी सोसायटी जागरूक सोसायटी’ या उपक्रमाचं  आयोजन करण्यात आलं.तर, डॉक्टर मंडळींनी

आपल्या रुग्णालयात दर्शनी भागात पोस्टर लावून तसंच  आपल्याकडे तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती करावी, असं आवाहन अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी वैष्णवी यांनी केलं आहे.

प्रसिद्ध गायक, संगीत दिग्दर्शक शंकर महादेवन यांनी मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

**पक्षांतर**

महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये घटक पक्षाला जागा मिळल्यानं नाराज झालेल्या इच्छुकांचा पक्षांतराचा ओघ सुरूच आहे. माजी आमदार आणि भारतीय जनता पक्षाचे नेते सुरेंद्र तथा बाळ माने यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. महायुतीच्या जागावाटपात रत्नागिरी विधानसभा मतदारसंघ भाजपला मिळावा, यासाठी बाळ माने बऱ्याच काळापासून प्रयत्नशील होते; मात्र शिवसेनेनं जाहीर केलेल्या यादीमध्ये उदय सामंत यांनाच उमेदवारी जाहीर झाल्याचं स्पष्ट झालं आहे. नाशिकमधल्या येवला लासलगाव मतदार संघातले शिवसेनेचे माजी आमदार कल्याणराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तर शिक्षक मतदार संघातील माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी राष्ट्रवादी पक्षातून उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ इथं झालेल्या महायुतीच्या पक्ष मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी खासदार निलेश राणे यांनी काल शिवसेना पक्षात प्रवेश केला.

**आकाशकंदील**

बुलडाणा जिल्ह्यातल्या मेहकर तालुक्यात हिवरा आश्रम इथं ध्यान केंद्राच्या माध्यमातून अनाथ बालकांच्या संगोपनाची जबाबदारी शिक्षक अनंत शेळके यांनी उचलली आहे. या विद्यार्थ्यांना कलाही जोपासता यावी यासाठी खामगाव इथले कलाशिक्षक संजय गुरव या विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू शिकवण्याचं काम मोफत करत आहेत. या उपक्रमाची माहिती देताना अनंत शेळके म्हणाले,

बाइट 41 सेकंद

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 27 तारखेला मन की बात या आकाशवाणीवरील मासिक कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा 115 वा भाग आहे. श्रोते येत्या 25 तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**कृषी विद्यापीठ**

महात्मा फुले कृषि विद्यापीठानं संशोधित केलेल्या विविध पिकांच्या 18 वाणांना कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं प्रसिध्द केलेल्या राजपत्रात स्थान मिळालं आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी केलेलं संशोधन राष्ट्रीय पातळीवर पोहोचलं आहे.

**फटाका**

चंद्रपूरमध्ये येत्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेतर्फे निश्चित केलेल्या अधिकृत ठिकाणीच स्टॉल्स लावण्याचे आणि फटाक्यांची विक्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मनपातर्फे कोहिनूर तलाव आणि कुंभार सोसायटी मैदान या ठिकाणी फटाके विक्री करण्याची दुकानं लावण्यास परवानगी देण्यात आली आहे.

**जवानमृत्यू**

भंडारा जिल्ह्यातल्या गौरनगर इथं कुटुंबीयांची भेट घेऊन कर्तव्यावर रुजू होण्यासाठी जात असलेल्या जवानाचा अपघातात मृत्यू झाला. खेमराज नान्हे यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनानं धडक दिल्यामुळं हा अपघात झाला. नान्हे यांच्या पार्थिव देहावर काल लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**हॉकी**

भारत आणि जर्मनी यांच्या दरम्यान काल नवी दिल्लीत झालेल्या सामन्यात भारताला दोन गोल्सनी पराभव स्वीकारावा लागला. राजधानी दिल्ली मध्ये सुमारे 10 वर्षांनी आंतरराष्ट्रीय हॉकी सामने होत असून भारत आणि जर्मनी यांच्या मध्ये 2 सामन्यांची मालिका खेळली जात आहेत. मालिकेतला दूसरा सामना आज होणार आहे.

**ओला दुष्काळ**

पालघर जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या दुप्पट पावसाची नोंद झाली आहे. यामुळे भात आणि नाचणी पिकांचं मोठं नुकसान झालं असून शासनानं या हंगामात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**